DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

www.thanevaibhav.in

ठाणेवैभव

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ

भारतीय सौर दिनांक माघ १८ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक १६४ | गुरुवार १० फेब्रुवारी २०२२ | पाने ६ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

आतील पानांत

वाईन विक्रीबाबतच्या निर्णयाविरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंची उपोषणाची घोषणा

लतादीदींच्या नावे आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय उभारलं जाणार; राज्यसरकारची घोषणा

कॉँग्रेसला इतके महत्त्व का ?

अग्रलेख / 5

CREDAI MCHI THANE | REALTY FOCUS THANE THE FUTURE IS HERE

FOR MORE DETAILS

www.mchithane.org

☎9833458323

थोडक्यात

आमदार नितेश राणेंना जामीन

ओरोस : आमदार नितेश राणे यांच्या नियमित जामीन अर्जावरील सुनावणी काल पूर्ण झाली असून आज याबाबतचा निर्णय दिला आहे. 30 हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर नितेश राणेंना जामीन न्यायालयाने मंजूर केला आहे. स्वीय सहायक राकेश परब यालाही जामीन मंजूर झाला आहे.

नितेश राणे यांनी आठवड्यातून एक दिवस कणकवली पोलीस ठाण्यात हजेरी लावावी. तसेच चार्ज शिट

➤➤पान २ वर

जुनांदुर्खी सरपंचपदी भाजपच्या भारती ठाकरे बिनविरोध

भिवंडी: तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत जुनांदुर्खी शिवाजी नगर टेंभिवली राजकीयदृष्ट्या महत्वाची मानली जाते. नुकताच जुनांदुर्खी ग्रामपंचायतीचे मावळते सरपंच महेंद्र पाटील यांचा कार्यकाल संपल्याने आपसांत ठरल्याप्रमाणे सरपंच पदाची निवडणुक घेण्यात आली.तुषार राऊत यांनी अध्यासी अधिकारी म्हणून कार्य पार पाडून सरपंचपदी भारती ठाकरे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. बिनविरोध

➤➤पान २ वर

ठाणे जिल्ह्यात दिवसभरात २४ हजार नागरिकांचे लसीकरण

ठाणे: कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहिमेत कोविन पोर्टलवरील नोंदीनुसार आज सायंकाळी सातपर्यंत ठाणे जिल्ह्यातील 24 हजार 213 नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण एक कोटी 24 लाख 12,130 डोसेस देण्यात आले. जिल्ह्यात आतापर्यंत पहिला डोस 68 लाख 1,512 नागरिकांना तर 54 लाख 98,428 नागरिकांना दुसरा डोस देण्यात आला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत एक लाख 12,190 जणांना बूस्टर डोस देण्यात आला आहे. आज दिवसभरात 375 लसीकरण केंद्र आयोजित करण्यात आले.

ठाणे जिल्हा कोरोनामुक्तीकडे; रुग्णसंख्या ४५ टक्क्यांनी कमी

ठाणे: जिल्ह्यात कोरोनाची दैनंदिन रुग्णसंख्या कमी आढळत असून जिल्ह्यातील सक्रिय रुग्ण संख्या एका आठवड्यात सुमारे 45 टक्क्यांनी कमी झाली आहे. 1 फेब्रुवारीला जिल्ह्यात 13,296 सक्रिय रुग्ण होते तर काल 8 फेब्रुवारी रोजी सक्रीय रुग्ण 7192 एवढी असल्याचे आरोग्य विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

आरोग्य विभागाच्या अहवालानुसार राज्यात सक्रिय रुग्ण संख्या असलेल्या पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये पुणे, नागपूर, ठाणे, अहमदनगर, मुंबई यांचा समावेश होतो. या पाच जिल्ह्यांमध्ये 1 फेब्रुवारीला 1 लाख 13 हजार 946 सक्रिय रुग्ण होते तर एका आठवड्यानंतर 8 फेब्रुवारीला ही संख्या 57 हजार 776 एवढी म्हणजे सुमारे 49.30 टक्क्यांनी कमी झाली आहे.

राज्याचा साप्ताहिक पॉझिटिव्हीटी दर हा 9.30 टक्के असून ठाणे जिल्ह्याचा साप्ताहिक पॉझिटिव्हीटी दर राज्य सरासरीपेक्षा खुपच कमी म्हणजे 3.80 टक्के असून मुंबई जिल्ह्याचा दर 2.10 टक्के आहे. राज्यातील 12 जिल्ह्यांचा साप्ताहिक पॉझिटिव्हीटी दर हा राज्य सरासरीपेक्षा कमी असून त्यामध्ये सर्वाधिक कमी दर हा मुंबई आणि ठाण्याचा आहे.

महापालिका हद्दीतील कोरोना हॉट स्पॉट असलेल्या नौपाडा-कोपरी या प्रभाग समितीमध्ये एकही रुग्ण सापडला नाही तसेच दिवा येथे देखील कोरोनाची पाटी कोरी राहीली. सर्वात जास्त 32रुग्ण माजिवडे-मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रात वाढले आहेत. सात रुग्ण वर्तकनगर आणि पाच रुग्णांची भर उथळसर प्रभाग समितीमध्ये पडली

➤➤पान २ वर

ठाण्यातील हॉट स्पॉट थंडावले

शहरातील कोरोना रुग्णांचा आलेख खाली आला असून आज ६० नवीन रूग्ण सापडले तर २४८जण रोगमुक्त झाले आहेत. दिवा आणि नौपाडा-कोपरी या प्रभाग समिती क्षेत्रात एकही रूग्ण सापडला नाही आणि सुदैवाने कोणीही दगावला नाही.

राज्याचे नगरविकास तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस राज्यभर विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. ठाण्यातही बुधवारी जल्लोषाचे वातावरण होते. त्यांच्या निवासस्थानी कुटुंबीयांसोबत वाढदिवस साजरा करताना पालकमंत्री एकनाथ शिंदे. सोबत शिवसेना नेते मिलिंद नार्वेकर, खासदार श्रीकांत शिंदे आणि अन्य.

कल्याण-ठाण्यातील सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक ऋतू ग्रुप यांनी नुकतेच त्यांच्या कल्याण येथील आधारवाडी परिसरात असलेल्या ऋतू सिटी रिव्हर व्ह्यू या टाऊनशिपमध्ये हनुमान मंदिराचे भूमीपूजन केले. यावेळेस पूजा करताना ऋतू ग्रुपचे संचालक मुकुंद पटेल, संगीता पटेल आणि ऋषी पटेल.

उल्हास नदी अखेर जलपर्णीमुक्त

जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी केली उल्हास नदीची पाहणी

कल्याण : उल्हास नदी अखेर जलपर्णीमुक्त झाली असून जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी आज उल्हास नदीची पाहणी केली. मी कल्याणकार सामाजिक संस्थेच्या 18 दिवस-रात्र उल्हास नदीपात्रात चाललेल्या आंदोलनाला यश मिळाले आहे. उल्हास नदी जलपर्णीमुक्त व्हावी व उल्हास नदीपात्रात कुठलीही प्रक्रिया न करता सोडण्यात येणारे सांडपाण्याचे तीन नाले तातडीने बंद करावेत, या दोन प्रमुख मागण्यांपैकी एक मागणी आज पूर्ण झाली असल्याची माहिती मी कल्याणकर संस्थेचे अध्यक्ष माजी नगरसेवक नितीन निकम यांनी दिली.

आज ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर व कल्याणचे तहसीलदार देशमुख यांनी जलपर्णीमुक्त उल्हास नदीचा पाहणी दौरा केला. त्यावेळी त्यांनी हा यशस्वी प्रयोग करण्यात आला. याबद्दल समाधान व्यक्त केले व

➤➤पान २ वर

पनामा ब्लेड कंपनी बंद पडणार?

हजारो कामगारांचे भवितव्य टांगणीला!

ठाणे: शहरातील सर्वात जुन्या पनामा ब्लेड कंपनीतील सुमारे सहा हजार कामगारांवर उपासमारीची पाळी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याचबरोबर कंपनी अग्निसुरक्षेची काळजी घेत नसल्याने भोपाळसारखी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

विद्युत मेटॅलिक्स लिमिटेड (पनामा) ही कंपनी तीन हात नाका येथे असून तिचे नवीन नाव सुपरमॅक्स असे आहे. या कंपनीचे माजी उपाध्यक्ष सुभाष चौधरी यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही धक्कादायक माहिती दिली. ही कंपनी सध्या ज्या व्यवस्थापनाच्या हातात आहे त्यांनी कंपनी जणू तोट्यात घालवण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत, असा आरोप श्री. चौधरी यांनी केला. कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन दिले जात नाही. त्यापोटी सुमारे 25 कोटी देणी थकली आहेत. तर या कंपनीवर अवलंबून असलेल्या छोट्या कंपन्यांची 50 कोटी थकीत देयके देणे बाकी असल्याचे श्री. चौधरी

➤➤पान २ वर

> **“ ही स्वदेशी कंपनी आहे. ती बंद पडता कामा नये. या कंपनीतील सुमारे सहा हजार कामगार आणि कंपनीवर अवलंबून असलेले इतर सात ते आठ हजार अशा 15 हजार कामगारांवर उपासमारीची पाळी येऊ नये, या हेतूनेच पत्रकार परिषद घेतली आहे, असे श्री. चौधरी म्हणाले. ठाण्यातील राजकीय नेत्यांनी तसेच राज्य आणि केंद्र सरकारने यामध्ये लक्ष घालावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.**

पावणेदोन वर्षाच्या साम्राज्य मराठेने सर केले कळसूबाई शिखर

➤➤पान २ वर

BHIWANDI

TEMGHAR PIPELINE
MAIN ROAD

- Independent Industrial Shed for Sale
- Area 12000 sqft
- 30' Height

Contact : 9820812907